## ०० प्रकरण - चौथे ००

### सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्या करिता राष्ट्रीयकृत बँकांनी राबविलेली स्वयं: रोजगार योजना

१९९१-९२

४·१ सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील राष्ट्रीयकृत बँका·

४·२ स्वयं रोजगार योजना· S.E.P.U.P.

४·३ सांगली जिल्ह्यातील योजनेची अंमल बजावणी·

४·४ S.E.P.U.P. खाली राष्ट्रीयकृत बँकांनी केंद्राप्रमाणे केलेले कर्जवाटप·

४·५ सांगली जिल्ह्यातील S.E.P.U.P. योजनेखाली राष्ट्रीयकृत बँकांनी वेगवेगळ्या लोकांना मार्च १९९२ अखेर केलेले कर्जवाटप·

४·६ सांगली जिल्ह्यात मार्च १९९२ अखेर S.E.P.U.P. खाली राष्ट्रीयकृत बँकांनी वेगवेगळ्या व्यवसायांना केलेले कर्जवाटप·

४·७ सांगली शहरातील गरीब लोकांना राष्ट्रीयकृत बँकांनी दिलेल्या कर्ज वाटपाची सारणीकरण किंवा एक मार्गी कोष्टक·

४·८ कर्ज वाटपाचे विश्लेषण

# प्रकरण - चौथे

## सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्या करिता राष्ट्रीयकृत बँकांनी राबविलेली स्वत: रोजगार योजना

### ४·१ : सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील राष्ट्रीयकृत बँका :-

देशामध्ये सामाजिक - आर्थिक परिवर्तन घडविणे या उद्देशाने भारतीय बँकिंग क्षेत्रातील सर्वात मोठ्या १४ खाजगी बँकांचे १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण करण्यात आले· त्यानंतर १९८० मध्ये पुन्हा ६ सर्वात मोठ्या खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले· त्यामुळे राष्ट्रीयकृत व्यापारी बँकांची संख्या २० इतकी झाली·

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर या २० बँकांनी शाखा विस्ताराचा धडक कार्यक्रम राबविला· बँकाच्या नव्या शाखा उघडताना ग्रामीण अर्धग्रामीण व नागरी भाग यांना प्राधान्य देण्यात आले· त्याचप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकांनी अनेक नव्या योजना राबविल्या· राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व ग्रामीण अर्धग्रामीण नागरी भागात विकासाचे नवे पर्व सुरु करण्यासाठी खालील प्रकारच्या योजना राबविल्या·

१) अग्रणी बँक योजना·

२) खेडे दत्तक योजना·

३) स्वयं रोजगार योजना·

४) उद्योजकता विकास कार्यक्रम·

५) विभिन्न व्याज दराने कर्ज योजना·

६) दुर्बल घटकांना कर्जे देण्याचे कार्यक्रम·

राष्ट्रीयकृत बँकातर्फे स्वयं रोजगार, सुशिक्षित बेकार, ग्रामीण युवक, माजी सैनिक, शेतमजूर, परंपरागत कारागीर, ग्रामीण गरीब,

अल्पसंख्यात जमाती इ. घटकांना सुध्दा अग्रक्रमाने कर्जपुरवठा केला जातो. व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयीकरणानंतर तत्काळ सन १९७० मध्ये (जानेवारी) अग्रणी बँक योजनेची कार्यवाही सुरु करण्यात आली. राष्ट्रीयीकरण झालेल्या व्यापारी बँकाच्यामध्ये देशातील सर्व जिल्हे वाटण्यात आले. आपआपल्या जिल्ह्यात आर्थिक विकासासाठी अग्रणी बँकेने पुढाकार घेतलेला आहे. सांगली जिल्ह्यासाठी बँक ऑफ इंडिया ही अग्रणी बँक म्हणून कार्य करीत आहे.

## सांगली शहरातील राष्ट्रीयकृत बँका :

श्री गणेशाचे आराध्य दैवत असलेले सांगली शहर हे प्रारंभी पासूनच महाराष्ट्रातील महत्वाचे व्यापारी केंद्र आहे. सांगली हे पटवर्धन राजसंस्थान म्हणून ओळखले जात होते. यासांगली शहरात १५ राष्ट्रीयकृत व्यापारी बँका कार्य करीत आहेत त्या बँका पुढील प्रमाणे -

१) बँक ऑफ इंडिया.
२) बँक ऑफ महाराष्ट्र.
३) बँक ऑफ बडोदा
४) स्टेट बँक ऑफ इंडिया ( ४ शाखा)
५) युनियन बँक ऑफ इंडिया (२ शाखा)
६) सेंट्रल बँक.
७) पंजाब नॅशनल बँक.
८) सिंडीकेट बँक.
९) कॅनरा बँक.
१०) कार्पोरेशन बँक.
११) विजया बँक.
१२) इंडियन बँक

१३) युको बँक·

१४) पंजाब अँड सिंध बँक·

१५) देना बँक·

मिरज शहरातील राष्ट्रीयकृत बँका :

सांगली जिल्ह्यामधील मिरज हे शहर "अ" वर्गीय नगरपालिका आहे· मिरज शहरात पुढील राष्ट्रीयकृत बँका कार्य करीत आहे·

१) बँक ऑफ इंडिया·

२) बँक ऑफ बडोदा·

३) बँक ऑफ महाराष्ट्र·

४) सिंडीकेट बँक·

५) विजया बँक·

६) युनियन बँक ऑफ इंडिया ( २ शाखा )

७) सेंट्रल बँक·

विटा शहरातील राष्ट्रीयकृत बँका :

सांगली जिल्ह्यातील विटा हे शहर "क" वर्गीय नगरपालिका आहे· तसेच विटा शहर हातमाग उद्योगासाठी सांगली जिल्ह्यात प्रसिध्द आहे· या शहरात खालील राष्ट्रीयकृत बँका कार्य करीत आहेत·

१) बँक ऑफ इंडिया·

२) स्टेट बँक ऑफ इंडिया·

३) युनियन बँक ऑफ इंडिया·

तासगांव शहरातील राष्ट्रीयकृत बँका :

तासगांव शहर हे "क" वर्गीय नगरपालिका आहे· तासगांव शहर हे सांगली जिल्ह्यातील द्राक्षे बाजारपेठ म्हणून अलिकडच्या काळात प्रसिध्द होत आहे· या शहरात पुढील राष्ट्रीयकृत बँका कार्य करीत आहे·

१) स्टेट बँक ऑफ इंडिया·

२) बँक ऑफ महाराष्ट्र

३) युनियन बँक ऑफ इंडिया·

इस्लामपूर शहरातील राष्ट्रीयकृत बँका :

इस्लामपूर हे शहर जिल्ह्यातील "ब" वर्गीय नगरपालिका आहे· या शहरात पुढील बँका कार्य करतात·

१) बँक ऑफ इंडिया·

२) स्टेट बँक ऑफ इंडिया·

३) बँक ऑफ महाराष्ट्र·

आष्टा शहरातील राष्ट्रीयकृत बँका :

आष्टा हे "ब" वर्गीय नगरपालिका आहे· या शहरात बँक ऑफ महाराष्ट्र ही बँक कार्य करीत आहे·

सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील दुर्बल कमकुवत व गरीब लोकांच्या विकासासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी केंद्र सरकार पुरस्कृत गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना राबविली आहे व या योजनेच्या माध्यमातून गरीब लोकांना स्वयं रोजगारासाठी कर्जपुरवठा केलेला आहे·

४·२ : नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना :

S.E.P.U.P.

केंद्र सरकारने भारतातील शहरीभागातील किंवा नागरी भागातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व गरीब लोकांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी व स्वत: रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांना अर्थ सहाय्य करण्यासाठी " S.E.P.U.P. " नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना" सप्टेंबर १९८६ साली सुरु केली ही योजना राष्ट्रीयकृत बँकामार्फत राबविली गेली·

योजनेचे उद्दिष्ट :

देशातील नागरी भागातील गरीब लोकांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी त्यांनी स्वयं रोजगार उभारावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

योजनेचा लाभ कोणाला मिळतो :

ही योजना देशातील नगरपालिका कार्यक्षेत्रात राबविली जात होती. शहरामध्ये ज्या कुटुंबाचे तीन वर्षे वास्तव्य आहे व शहरात रेशन कार्डची नोंद आहे. त्याचप्रमाणे ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ हजार रुपयांपर्यंत आहे किंवा कुटुंबाचे प्रत्येक महिना जास्तीत जास्त ६०० रुपयांपर्यंत उत्पन्न आहे अशा कुटुंबातील एकाच व्यक्तीला स्वयं रोजगारासाठी कर्ज दिले जाते. या योजनेद्वारे कर्ज मिळविण्यासाठी शिक्षणाची अट नाही. १८ ते ४० वयोगटातील असलेल्या व्यक्तीला कर्जपुरवठा केला जातो.

अंमल बजावणी :

केंद्र शासनाच्या बँकिंग विभागातर्फे हा कार्यक्रम राबविला जाई. नागरी भागातील राष्ट्रीयकृत बँका मार्फत कर्जदाराचे कर्ज मागणीचे अर्ज स्वीकारले जाते. बँके तर्फे या अर्जाचा विचार होऊन कर्जदारास जास्तीत जास्त ५,००० रुपयांपर्यंत कर्ज मंजूर केले जात. एकूण कर्ज रकमेच्या २५ टक्के रक्कम केंद्र शासनातर्फे अनुदान म्हणून देण्यात येत. बँकेकडे कर्ज मंजूर झाल्यानंतर अनुदानाची रक्कम परस्पर बँकेकडे पाठविण्यात येते. कर्जदाराची कर्जासाठी कोणत्याही प्रकारची चल व अचल मालमत्ता तारण घेतली जात नाही. कर्जातून निर्माण करण्यात आलेली मालमत्ता हीच तारण समजण्यात येई. कर्जावरील व्याज दर १० टक्के होता. कर्जाची परत फेडीची मुदत ३६ महिने म्हणजेच तीन वर्षे अशी होती.

कोणत्या व्यवसायाला कर्जपुरवठा :

संबंधीत शहरात जे किरकोळ स्वरूपाचे व्यवसाय चालतात किंवा स्थानिक परीस्थितीला अनुकूल जे व्यवसाय असतात अशा व्यवसायांना कर्जपुरवठा केला जातो. उदा. पान शॉप, बेकरी, किराणा माल दुकान, चहा गाडी, भाजीपाला विक्री, किरकोळ कापड विक्री, सायकल दुकान, रिक्षा, खरेदी, टेलरिंग व्यवसाय,गाडी भाड्याने देणे, लोहारकाम, सुतारकाम, खाणावळ चालविणे, पुस्तक विक्री, हेअर कटींग सलून, अंडी विक्री इ. व्यवसायांना या योजनेव्दारे अर्थ सहाय्य केले जाते. जिल्ह्यातील नागरी भागातील किती लोकांना कर्जपुरवठा या योजनेव्दारे राष्ट्रीयकृत बँकांनी करावा. याबाबतचे उद्दिष्ट सरकारकडून ठरवून दिले जाई. प्रत्येक जिल्ह्यात जी व लीड बँक असते ती नागरी भागातील राष्ट्रीयकृत बँकांना उद्दिष्ट ठरवून देई. ते उद्दिष्ट पूर्ण करण्याची जबाबदारी प्रत्येक बँकेची असे. सर्वसाधारण या योजनेव्दारे ज्या लोकांना कर्जपुरवठा केला जाई. त्या लोकांमध्ये ३० टक्के लोक एस्.सी. व एस्.टी. असावेत अशी या योजनेत तरतुद होती.

सप्टेंबर १९८६ साली सुरु झालेली " S.E.P.U.P. " नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना मार्च १९९२ अखेर सुरु होती. त्यानंतर ही योजना नेहरु रोजगार योजनेत समाविष्ट केलेली आहे. कारण या दोन्ही योजनेचा उद्देश हा एकच आहे व या दोन्ही योजना नगरपालिका कार्यक्षेत्रात व राष्ट्रीयकृत बँकामार्फत राबविल्या जात.

सांगली जिल्ह्यातील नागरी भागात मिरज,विटा,इस्लामपूर तासगांव,आष्टा या शहरात ही योजना त्या त्या शहरातील राष्ट्रीयकृत बँकांनी राबविली आहे. प्रत्येक शहरासाठी बँक ऑफ इंडिया या लीड बँकेने जे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. ते उद्दिष्ट पूर्णकरण्याची जबाबदारी त्यात्या शहरातील राष्ट्रीयकृत बँकांनी पार पाडलेली आहे.

## ४·३ : सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी राबविलेली स्वयं रोजगार योजना" :

जिल्ह्यातील नागरी भागात स्वयं रोजगार योजना सप्टेंबर १९८६ सालापासून राष्ट्रीयकृत बँकामार्फत राबविलेली आहे· जिल्ह्यातील नागरी भागात या योजनेखाली किती लोकांना कर्जपुरवठा करावा याबाबत जिल्ह्यासाठी प्रत्येक वर्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते·

सांगली जिल्ह्यासाठी प्रत्येक वर्षी कर्जपुरवठा करण्याबाबत ठरवून दिलेले उद्दिष्ट व प्रत्यक्षात बँकांनी केलेला कर्जपुरवठा

| वर्ष | कितीललोकांना कर्जपुरवठा उद्दिष्ट | व प्रत्यक्षात लोकांना केलेला कर्जपुरवठा |
|---|---|---|
| १९८७–८८ | १२०८ | ९०१ |
| १९८८–८९ | १२०८ | ९४२ |
| १९८९–९० | १२०८ | ९१६ |
| १९९०–९१ | ६०४ | २९४ |
| १९९१–९२ | ६०४ | २६९ |

टेबल क्रमांक – १ : अग्रणी बँक जिल्हा पतयोजना (बँक ऑफ इंडिया)

केंद्र सरकारला रिझर्व्ह बँकेने अशी सूचना केली होती की, ही योजना १९९१–९२ या वर्षी नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी चालवावी व जिल्ह्यातील नागरी भागातील ६०० लोकांना या योजनेखाली कर्जपुरवठा करावा व प्रत्येकी ३० टक्के लोक एस्·सी·/ एस·टी·असावेत·

सांगली जिल्ह्यातील नागरी भागासाठी ही स्वयं रोजगार योजना १९९१-९२ या वर्षी राष्ट्रीयकृत बँका मार्फत राबविली गेली व जिल्ह्यातील सांगली, शहर, मिरज, तासगांव, विटा, इस्लामपूर, आष्टा या शहरात किती लोकांना कर्जपुरवठा करावा याबाबत उद्दिष्ट ठरवून देण्यात आले. तसेच त्यामध्ये एस.सी. किती लोक असावेत याबाबत ही उद्दिष्ट ठरवून देण्यात आले.

| शहराचे नाव | उद्दिष्ट किती लोकांना कर्ज पुरवठा जनरल/उद्दिष्ट. | एस.सी./ एस.टी./ उद्दिष्ट | एकूण उद्दिष्ट |
|---|---|---|---|
| सांगली | १७८ | ७६ | २५४ |
| मिरज | १२३ | ५३ | १७६ |
| विटा | २८ | १२ | ४० |
| इस्लामपूर | ३८ | १७ | ५५ |
| तासगाव | ३१ | १३ | ४४ |
| आष्टा | २४ | ११ | ३५ |
| एकूण :- | ४२२ | १८२ | ६०४ |

टेबल क्रमांक - २ : अग्रणी बँक जिल्हा पत योजना १९९१-९२
बँक ऑफ इंडिया.

| अ.नं. | बँकेचे नांव | उद्दिष्ट सर्वसामान्य | एससी/एसटी | एकूण | अर्ज एकूण संख्या | मंजूर | नामंजूर | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ इंडिया | ९ | ४ | १३ | २१ | ८ | - | १३ |
| २) | बँक ऑफ महाराष्ट्र | ९ | ४ | १३ | १८ | ८ | ३ | ७ |
| ३) | बँक ऑफ बडोदा | ९ | ४ | १३ | १७ | ८ | - | ९ |
| ४) | स्टेट बँक (चार शाखा) | ३६ | १६ | ५२ | ५९ | २७ | २२ | १० |
| ५) | युनियन बँक (तीन शाखा) | २७ | १२ | ३९ | ३९ | १६ | १७ | ६ |
| ६) | सेंट्रल बँक | ९ | ४ | १३ | २७ | ८ | - | १९ |
| ७) | पंजाब नॅशनल बँक | ९ | ४ | १३ | २१ | १३ | ४ | ४ |
| ८) | सिंडीकेट बँक | ९ | ३ | १२ | २० | १२ | २ | ६ |
| ९) | कॅनरा बँक | ९ | ४ | १३ | १२ | १० | १ | १ |
| १०) | कॉर्पोरेशन बँक | ८ | ४ | १२ | ३० | ९ | ७ | १३ |
| ११) | विजया बँक | ८ | ४ | १२ | २५ | ११ | - | १४ |
| १२) | इंडियन बँक | ९ | ४ | १३ | १७ | ९ | ३ | ५ |
| १३) | युकोब बँक | ९ | ३ | १२ | १८ | ६ | ५ | ७ |
| १४) | पंजाब ॲन्ड सिंध बँक | ९ | ३ | १२ | ३० | ९ | - | २१ |
| १५) | देना बँक | ९ | ३ | १२ | १५ | ३ | ३ | ९ |
| | एकूण : | १७८ | ७६ | २५४ | ३६९ | १५७ | ६८ | १४४ |

टेबल क्रमांक - ३ : अग्रणी बँक जिल्हा पत योजना १९९१-९२ बँक ऑफ इंडिया.

४·४ : राष्ट्रीयकृत बँकांनी ( S.E.P.U.P. ) खालील केंद्राप्रमाणे केलेले कर्ज वाटप :

खालील कोष्टकात सन १९९१-९२ मध्ये ( S.E.P.U.P. ) खाली राष्ट्रीयकृत बँकानी सांगली जिल्ह्यातील नागरी भागात केलेले कर्ज वाटप : (मार्च १९९२ अखेर)

सांगली शहर

| अ.नं. | बँकेचे नांव | सर्वसामान्य | एससी/एसटी. | एकूण | एकूण संख्या | मंजूर | नामंजूर | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ इंडिया | १३ | ५ | १८ | ५ | ५ | - | - |
| २) | बँक ऑफ बरोडा | १२ | ६ | १८ | ५ | १ | ४ | - |
| ३) | बँक ऑफ महाराष्ट्र | १२ | ६ | १८ | ५ | १ | १ | ३ |
| ४) | सिंडीकेट बँक | १२ | ५ | १७ | १६ | ९ | ३ | ४ |
| ५) | विजया बँक | १२ | ६ | १८ | ८ | २ | - | ६ |
| ६) | युनियन बँक ऑफ इंडिया २ शाखा. | २५ | १० | ३५ | ११ | ४ | २ | ५ |
| ७) | स्टेट बँक ऑफ इंडिया २ शाखा. | २५ | १० | ३५ | १० | ६ | - | ४ |
| ८) | सेंट्रल बँक | १२ | ५ | १७ | १३ | ८ | - | ५ |
| | एकूण : | १२३ | ५३ | १७६ | ७३ | ३६ | १० | २७ |

टेबल क्रमांक ४ : अग्रणी बँक जिल्हा पत योजना १९९१-९२.

विटा शहर

| | | उद्दिष्ट | | | अर्ज | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | बँकेचे नांव | सर्व सामान्य | एससी/एसटी. | एकूण संख्या | एकूण संख्या | मंजूर | नामंजूर | शिल्लक |
| १) | बँक ऑफ इंडिया | १० | ४ | १४ | ९ | ३ | ४ | २ |
| २) | स्टेट बँक | ९ | ४ | १३ | २ | १ | - | १ |
| ३) | युनियन बँक ऑफ इंडिया | ९ | ४ | १३ | १ | " | - | १ |
| | एकूण :- | २८ | १२ | ४० | १२ | ४ | ४ | ४ |

टेबल क्रमांक ५ ÷ अग्रणी बँक जिल्हा पत योजना १९९१-९२ मार्च १९९२ अखेर·



मिरज शहर (मार्च १९९२ अखेर)

उद्दिष्ट·

अर्ज

इस्लामपूर शहर (मार्च १९९२ अखेर)

| अ.नं. | बँकेचे नांव | उद्दिष्ट सर्वसामान्य | एससी/एसटी. | एकूण | अर्ज एकूण संख्या | मंजूर | नामंजूर | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ इंडिया | १३ | ५ | १८ | १९ | १९ | - | - |
| २) | स्टेट बँक | १२ | ६ | १८ | १८ | १ | - | १७ |
| ३) | बँक ऑफ इंडिया | १२ | ६ | १८ | ३ | १ | १ | १ |
| | एकूण :- | ३७ | १७ | ५४ | ४० | २१ | १ | १८ |

टेबल क्रमांक : ६ अग्रणी बँक जिल्हा पत योजना १९९१-९२.

तासगांव शहर (मार्च १९९२ अखेर)

| अ.नं. | बँकेचे नांव | उद्दिष्ट सर्व सामान्य | एससी/एसटी. | एकूण | अर्ज एकूण संख्या | मंजूर | नामंजूर | शिल्लक. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ महाराष्ट्र | १० | ५ | १५ | ९ | ६ | - | ३ |
| २) | स्टेट बँक | ११ | ४ | १५ | १० | १० | - | - |
| ३) | युनियन बँक ऑफ इंडिया | १० | ४ | १४ | ४ | १ | - | ३ |
| | एकूण :- | ३१ | १३ | ४४ | २३ | १७ | - | ६ |

टेबल क्रमांक ७

| अ.नं. | बँकेचे नांव | सर्वसामान्य | एसुसी/एसटी | एकूण | एकूण संख्या | मंजूर | नामंजूर | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ महाराष्ट्र | २४ | ११ | ३५ | ३ | ३ | - | - |

४.५ : सांगली जिल्ह्यातील ( S.E.P.U.P. ) योजनेखाली राष्ट्रीयकृत बँकांनी केलेले कर्ज वाटप मार्च १९९२ अखेर (वेगवेगळ्या लोकांना) (रक्कम हजारात).

| | केंद्राचे नांव | एकूण उद्दिष्ट | आलेले अर्ज | सर्व सामान्य खातेदारांची संख्या. | रक्कम | एसुसी/एसटी. खातेदारांची संख्या | रक्कम | नामंजूर अर्ज | शिल्लक | सर्वसामान्य खातेदारांची संख्या | रक्कम | एसुसी/एसटी खातेदाराची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सांगली | २५६ | ३४९ | १४३ | ७९३ | २० | ९० | १८६ | - | १२५ | ७०५ | २० | ८२ |
| २) | मिरज | १७६ | ९८ | ५६ | १६४ | ७ | ३१ | ३४ | - | ४६ | ११४ | ६ | २७ |
| ३) | विटा | ४० | ४४ | २८ | ६२ | १० | २६ | ६ | - | २८ | ६२ | १० | २६ |
| ४) | इस्लामपूर | ५४ | ४४ | ३७ | ९८ | ७ | २८ | - | - | ३५ | ९८ | ७ | २८ |
| ५) | तासगांव | ४४ | ३८ | २५ | १२० | १० | २५ | २ | १ | २५ | ११८ | - | - |
| ६) | आष्टा | ३५ | १० | १० | ५० | - | - | - | - | १० | ५० | - | - |
| | एकूण : | ६०३ | ५८२ | २९९ | १२८७ | ५४ | २०० | २२८ | १ | २६९ | ११४७ | ४३ | १६३ |

टेबल क्रमांक ८ आग्रणी बँक जिल्हा पत योजना

आष्टा (मार्च १९९२ अखेर)

उद्दिष्ट

अर्ज

४·६ : सांगली जिल्ह्यातील नागरी भागात मार्च १९९२ अखेर ( S.E.P.U.P. ) खाली राष्ट्रीयकृत बँकेनीः वेगवेगळ्या व्यवसायांना केलेले कर्जवाटप· (रक्कम हजारात)

| केंद्राचे नाव | लहान व्यवसाय | | कारागीर व कलाकुसरी | | सेवा व्यवसाय | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खाते | रक्कम | खाते | रक्कम | खाते | रक्कम | खाते | रक्कम | खाते | रक्कम |
| सांगली | ५० | ३९५ | ३० | १४० | ४३ | १८७ | २२ | ६३ | १४५ | ७८५ |
| मिरज | २७ | ७३ | ७ | १९ | ८ | २२ | १० | २७ | ५२ | १४१ |
| विटा | १८ | ४२ | ७ | १६ | ८ | १९ | ५ | ११ | ३८ | ८८ |
| तासगांव | १५ | ६८ | - | - | ४ | २० | ६ | ३० | २५ | ११८ |
| इस्लामपूर | १२ | ३६ | १० | ३० | ५ | १५ | १५ | ४५ | ४२ | ११६ |
| आष्टा | ५ | २८ | - | - | ३ | २० | ६ | ५० | १४ | ९८ |
| एकूण : | १२७ | ६४२ | ५४ | २०५ | ७१ | २८३ | ६४ | २२६ | ३१६ | १३५६ |

टेबल क्रमांक ९ : अग्रणी बँक जिल्हा पत योजना १९९१-९२·

## ४·७ : नागरी भागातील "गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना" ( S.E.P.U.P. ) या योजनेखाली सांगली शहरातील गरीब लोकांना राष्ट्रीयकृत बँकांनी दिलेल्या कर्जवाटपाची सारणीकरण करणे किंवा एक मार्गी कोष्टक·

१) मुख्य व्यवसाय :

| | | |
|---|---|---|
| अ) शेती | III | ३ |
| ब) मजुरी | 卌 卌 卌 卌 卌 III | २८ |
| क) नोकरी | 卌 II | ७ |
| ड) स्वयंरोजगार | 卌 卌 II | १२ |

२) घर :

| | | |
|---|---|---|
| अ) मालकीचे | 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 III | ३८ |
| ब) भाड्याचे | 卌 卌 II | १२ |
| क) घरापासून मिळणारे भाडे | IIII | ४ |

३) रोजगाराचे स्वरूप :

| | | |
|---|---|---|
| अ) नियमीत | 卌 卌 卌 | १५ |
| ब) अनियमित | 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 | ३५ |

४) इतर धंद्यात केलेली भांडवलगुंतवणूक :

| | | |
|---|---|---|
| अ) रु.१,००० ते ३,००० | | - |
| ब) रु.३,००० ते ५,००० | 卌 卌 卌 卌 | २० |
| क) रु.५,००० ते ७,००० | 卌 卌 卌 卌 卌 ||| | २८ |
| ड) रु.७,००० ते १०,००० | || | २ |

५) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न :

| | | |
|---|---|---|
| अ) १,००० ते ३,००० | ||| | ३ |
| ब) ३,००० ते ५,००० | 卌 || | ७ |
| क) ५,००० ते ७,००० | 卌 卌 卌 卌 卌 卌 卌 | ३५ |
| ड) ७,००० ते १०,००० | 卌 | ५ |

६) कुटुंबाचा वार्षिक खर्च :

| | | |
|---|---|---|
| अ) १,००० ते ३,००० | || | २ |
| ब) ३,००० ते ५,००० | 卌 卌 卌 || | १७ |
| क) ५,००० ते ७,००० | 卌 卌 卌 卌 | | २१ |
| ड) ७,००० ते १०,००० | 卌 卌 | १० |

७) मिळालेले कर्ज पुरेसे आहे काय :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 | १५ |
| ब) नाही | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ३५ |

८) कर्जासाठी अडचणी :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 \|\|\| | ३८ |
| ब) नाही | 𝍸 𝍸 \|\| | १२ |

९) घेतलेल्या कर्जामुळे नियमित रोजगार मिळाला काय :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 \|\|\| | ३८ |
| ब) नाही | 𝍸 𝍸 \|\| | १२ |

१०) कर्जामुळे उत्पन्नात झालेली वाढ :

| | | |
|---|---|---|
| अ) १,००० ते ३,००० रु. | 𝍸 \| | ६ |
| ब) ३,००० ते ५,००० रु. | 𝍸 𝍸 | १० |
| क) ५,००० ते ७,००० रु. | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | २५ |
| ड) ७,००० ते १०,००० रु. | 𝍸 \|\|\|\| | ९ |

११) राहणीमान वाढ :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 \|\| | ४२ |
| ब) नाही | 𝍸 \|\|\| | ८ |

१२) <u>योजना फायदेशीर झाली काय</u> :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍷𝍷𝍷 | ३३ |
| ब) नाही | 𝍸 𝍸 𝍸 𝍷𝍷 | १७ |

१३) <u>कर्ज परत फेडीच्या अटी सोयीस्कर आहेत काय</u> :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ४० |
| ब) नाही | 𝍸 𝍸 | १० |

१४) <u>कर्जाची थकबाकी आहे काय</u> :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 | १५ |
| ब) नाही | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ३५ |

१५) <u>कर्ज माफ करावे वाटते काय</u> :

| | | |
|---|---|---|
| अ) होय | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍷𝍷 | ३७ |
| ब) नाही | 𝍸 𝍸 𝍷𝍷𝍷 | १३ |

१६) <u>योजना यशस्वी करण्यासाठी शासनाने काय करावे</u> :

| | | |
|---|---|---|
| अ) व्याजदर कमी | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | ३० |
| ब) अनुदान रकमेत वाढ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 | २५ |
| क) कर्ज रकमेत वाढ | 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍸 𝍷𝍷 | ४७ |

## ४·८ : नागरी भागातील गरीब लोकांच्यासाठी स्वयं रोजगार योजना :

( S.E.P. U. P. ) या केंद्र सरकार पुरस्कृत योजनेखाली सांगली जिल्ह्यातील नागरी भागातील गरीब लोकांना राष्ट्रीयकृत बँकांनी १९९१-९२ या आर्थिक वर्षात एकंदर ३१६ लाभ धारकांना या योजनेखाली कर्जपुरवठा केलेला आहे· सर्व साधारणपणे ६०४ लोकांना (लाभार्थींना) पितपुरवठा करण्याचे जिल्ह्याचे १९९१-९२ चेउद्दिष्ट होते· परंतु राष्ट्रीयकृत बँकांनी या आर्थिक वर्षात ३१६ लाभार्थींना स्वयंरोजगारासाठी अर्थ सहाय्य केलेले आहे· त्यापैकी सांगली शहरात सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांनी मिळून १७५ लोकांना कर्जपुरवठा केलेला होता· त्यापैकी २० लोक हे अनुसूचित जाती व जमातीचे आहेत· या १७५ लोकांपैकी अभ्यासासाठी ५० लोकांची निवड केलेली आहे· त्या लोकांची श्री माहिती गोळा केलेली आहे· त्या माहितीचे साधे किंवा एकमार्गी कोष्टक बनविलेले आहे· त्या कोष्टकांच्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केलेले आहे·

१) मुख्य व्यवसाय :

या योजनेचा अभ्यास करण्यासाठी या योजनेखाली ज्या लोकांना राष्ट्रीयकृत बँकांनी कर्जपुरवठा केलेला आहे· त्यापैकी ५० लोक अभ्यासासाठी घेतले होते· या ५० लोकांपैकी ३ लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे· तर मजुरी हा मुख्य व्यवसाय २८ लोकांचा आहे· तर ७ लोक नोकरी करणारे आहेत· तर स्वयं रोजगार करणारे लोक १२ एवढे आहेत·

२) घर :

योजनेचा अभ्यास करण्यासाठी जे ५० लोक घेतले त्यापैकी ३८ लोकांना स्वत: मालकीचे घर आहे तर १२ लोकांना स्वत:च्या मालकीचे घर नसल्याचे आढळून आले ते भाड्याच्या घरात राहत आहेत व

व ४ लोकांना स्वत:च्या घरापासून भाड्याच्या रूपाने काही प्रमाणात उत्पन्न मिळते.

३) रोजगाराचे स्वरूप :

जे ५० लोक अभ्यासासाठी घेतलेल्यापैकी ३५ लोकांना अनियमित रोजगार मिळतोय तर १५ लोक हे नियमीत रोजगार मिळणारे आहेत.

४) इतर धंद्यात केलेली भांडवल गुंतवणूक :

मुख्य व्यवसाय सोडून इतर धंद्यात केलेली भांडवल गुंतवणूक रुपये ३००० ते ५००० पर्यंत २० लोकांनी भांडवल गुंतवणूक स्वयं रोजगारासाठी व्यवसायात केलेली आहे. तर २८ लोकांनी रु.५,००० ते ७,००० पर्यंत स्वयं रोजगारासाठी भांडवल गुंतवणूक केलेली आहे. तर २ लोकांनी रु. ७,००० ते १०,००० पर्यंत भांडवल गुंतवणूक व्यवसायात केलेली आहे.

५) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न :

या योजनेचा अभ्यास करण्यासाठी जे लाभार्थी घेतले आहेत त्यापैकी ३ लोकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ३,००० पर्यंत आहे. तर ७ लोकांचे वार्षिक उत्पन्न रु. ३,००० ते ५,००० पर्यंत आहे. व ३५ लोकांचे वार्षिक उत्पन्न रु. ५,००० ते ७,००० पर्यंत आहे तर ५ लोकांचे वार्षिक उत्पन्न रु. ७,००० ते १०,००० पर्यंत आहे.

६) कुटुंबाचा वार्षिक खर्च :

ज्या लोकांचा अभ्यास केला त्यापैकी २ लाभ धारकांच्या कुटुंबाचा वार्षिक खर्च रु.३,००० पर्यंत आहे तर १७ लाभ धारकांच्या कुटुंबाचा वार्षिक खर्च रु.५,००० पर्यंत आहे व २१ लाभ धारकांच्या कुटुंबाचा वार्षिक खर्च रु.७,००० पर्यंत आहे आणि १० लाभधारकांच्या कुटुंबाचा वार्षिक खर्च रु.७,००० ते १०,००० पर्यंत आहे.

७) मिळालेले कर्ज पुरेसे आहे काय :

या योजनेचा अभ्यास करण्यासाठी ज्या ५० लोकांची माहिती घेतली त्यापैकी १५ लोकांना मिळालेल्या कर्जाची रक्कम पुरेसे वाटली तर ३५ लोकांना या योजनेखाली मिळालेल्या कर्जाची रक्कम अपुरी किंवा कमी वाटते.

८) कर्ज मिळण्यास आलेल्या अडचणी :

ज्या ५० लोकांची माहिती गोळा केली त्यापैकी या योजनेखाली कर्ज मिळविण्यासाठी ३८ लोकांना अडचणी आल्या. तर १२ लोकांना कर्ज मिळण्यास फारसा अडचणी आल्या नाहीत.

९) नियमीत रोजगार :

ज्या ५० लोकांची माहिती गोळा केली त्यापैकी ३८ लोकांना या योजनेखाली राष्ट्रीयकृत बँकाकडून जे स्वयं रोजगारासाठी कर्ज घेतले त्या कर्जामुळे त्यांना नियमीत रोजगार मिळाला. तर १२ लोकांना या कर्जामुळे कायम स्वरूपात रोजगार उपलब्ध झाला नाही.

१०) कर्जामुळे उत्पन्नात झालेली वाढ :

ज्या लोकांची माहिती गोळा केली त्यापैकी ६ लोकांच्या वार्षिक उत्पन्नात रु. ३,००० पर्यंत वाढ झाली तर १० लोकांच्या कुटुंबात रु. ५,००० पर्यंत वाढ झाली व २५ लाभार्थी लोकांच्या वार्षिक उत्पन्नात स्वयं रोजगारात रु.७,०००/- पर्यंत वाढ झाली. तर रु.७,००० ते रु.१०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्नात वाढ झालेली ९ लोक होते.

११) राहणीमानात वाढ :

ज्या ५० लोकांची माहिती गोळा केली त्यापैकी ४२ लोकांच्या राहणीमानात वाढ झाल्याची आढळून आली.

१२) <u>योजना कुटुंबाचे मासिक उत्पन्न वाढीस फायदेशीर :</u>

ज्या ५० लोकांचा अभ्यास केला त्यापैकी ३३ लोकांना ही योजना उत्पन्न वाढीस फायदेशीर झाली आहे. तर १७ लोकांना या योजनेपासून उत्पन्न वाढीस फारशी मदत झाली नाही.

१३) <u>कर्ज परतफेडीच्या बाबत :</u>

या योजनेमधील कर्ज परतफेडीच्या बाबतच्या ज्या अटी आहेत त्याबाबत ४० लोकांना कर्ज परतफेडीच्या अटी योग्यच वाटल्या तर १० लोकांना कर्ज परतफेडीच्या अटी अयोग्य वाटल्या.

१४) <u>कर्जाची थकबाकी :</u>

जे लोक अभ्यासासाठी घेतले त्यापैकी १५ लोकांच्या कर्जाची थकबाकी आढळून आली.

१५) <u>कर्ज माफ करावे :</u>

ज्या ५० लोकांची माहिती गोळा केली त्यापैकी ३७ लोकांना कर्ज माफ करावे असे वाटते.

१६) <u>योजना यशस्वी होण्यासाठी शासनाने करावयाचे प्रयत्न :</u>

ही योजना यशस्वी होण्यासाठी शासनाने काय करावे या बाबत लोकांनी आपले मत सांगताना ३० लोकांनी व्याजदर कमी करावा असे सांगितले तर २५ लोकांनी अनुदान रक्कमेत वाढ करावे असे सांगितले. तर ४७ लोकांनी कर्ज रक्कमेत वाढ करावी असे सांगितले.

---

संदर्भ : १) सांगली जिल्हा अग्रणी बँक. बँक ऑफ इंडिया
इतर अहवाल. वार्षिक पत योजना.
२) जिल्ह्यातील नागरी भागातील राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा.

//////